
क्रान्तीधर्मी पुस्तक माला 17

# भावसंवेदनांची गंगोत्री



—पं. श्रीराम शर्मा आचार्य

# भावसंवेदनांचीं गंगोत्री

सत्य, प्रेम, न्याय

-श्रीराम शर्मा आचार्य

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

# भावसंवेदनांची गंगोत्री

## १. वेदव्यासांची अंतर्व्यथा

"आपल्या मुखावर खिन्नतेचे चिन्ह? सरस्वती नदीच्या किनाऱ्यावर आश्रमाच्या जवळ बसलेल्या विचारवंताच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून तो नवखा मनुष्य म्हणाला. अलिकडे बऱ्याच दिवसांपासून ते खिन्न वाटायचे. नदीच्या तीरावर बसून तासन् तास विचारमग्न असत. शून्यात पहात राहायचे हीच त्यांची अलिकडची दिनचर्या बनली होती. आजही ते अशाच अवस्थेत बसले होते.

आगंतुक व्यक्तीच्या प्रश्नाने त्यांची विचारांची तंद्री तुटली

'आपण देवर्षी!' मुखावर आश्चर्याचे आणि प्रसन्नतेचे मिळते जुळते भाव प्रकट होत होते.

"पण तुम्ही व्यथित कशासाठी?" जवळच्याच आसनावर बसत ते म्हणाले, "इतरांचं दुःख दूर करणारा स्वतः दुःखी? वैद्यालाच रोग? कशी विचित्र स्थिती आहे?"

"विचित्रता नाही, विवशता आहे असे म्हणा. इतरांची दुःख दूर करण्यात असमर्थ ठरणारा व समोर त्यांना विव्हळताना पाहूनही काही करू न शकणारा जी अंतर्व्यथा अनुभवतो तशी ही माझी व्यथा आहे. समोरच्या तडफडणाऱ्या रोग्याला पाहूनही त्याला बरा करण्यात अपयशी ठरलेल्या वैद्याला अशीच अंतरिक दुःखाची जाणीव होते."

थोड थांबून त्यांनी दीर्घ उसासा टाकला आणि पुनः म्हणाले, "व्यक्ती आणि समाजाच्या रूपात मनुष्य सन्निपाताच्या रोगाने ग्रस्त आहे. कधी हसतो गातो नाचतो. तर कधी अहंकाराच्या ठसक्यात आखडून ऐटीत चालतो. परस्परांवरचा विश्वासच उडाला तर आचार-विचारांची काय स्थिती होईल? जे थोडं फार दिसत आहे. तही उध्वस्ताचे अवशेष आहे, केवळ देखावा...!'

"आणि परिवार...." एवढे बोलून ते समोर बसलेल्या देवर्षींच्याकडे पाहू लागले. चेहऱ्यावर क्षीण स्मित हास्य होते. ते म्हणाले, "त्याची स्थिती तर

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

अधिकच दयनीय आहे. कुटुंबियांत फक्त मोह राहिला आहे, प्रेम मेले आहे. मोह सुद्धा तोवरच जोवर स्वार्थ साधेल. विवाह होताच मुलं आई-बापांचा त्याग करतात. सर्वच रीत उलटी झाली आहे. उभा असलेला खाली पाडणं, पडलेल्याला पायदळी तुडवणं, हेच सुरू आहे. मनुष्य आणि पशु यांच्यातला भेद आचार-विचारात राहिलेला नाही, फक्त आकार-प्रकारातच उरला आहे." बोलता बोलता ऋषीच्या मुखावर हलबलतेचा भाव स्पष्ट दिसत होता. कसा बसा आपला भाव लपवित ते पुढे म्हणाले, "देवता बनायला चाललेला मनुष्य पशुपेक्षाही हीन पातळीवर जाऊन पोहचला आहे."

"महर्षी व्यास! आपण तर विचारवंतांचे मुकुटमणी आहात! आपण काही उपाय केला नाही का?" काहीसा विचार करीत देवर्षी म्हणाले.

"प्रयत्न...! प्रयत्न न करता कसा जिवंत राहू शकेन! भयग्रस्त मानवतेला मार्ग दाखवण्याचा जो प्रयत्न करीत नाही, हातावर हात ठेवून आपल्याच बौद्धिक अहंकारात ग्रस्त असतो, त्याला विचारवंत म्हणवण्याचा काय अधिकार आहे? त्याला जिवंत राहण्याचाही अधिकार नाही."

"कोणते प्रयत्न केले?" देवर्षी.

"मानवी बुद्धीच्या शुद्धीचा प्रयत्न. त्यासाठी वैदिक मंत्रांचं पुन्हा विभाजन केलं. कर्मकांडाला सुटसुटीत रूप दिलं. हेतु असा की मंत्रांमध्ये निहित दिव्य भावना हृदयंगम करणं सोप व्हावं. पण...."

पण काय?

प्राणांचा त्याग करून लोक कर्मकांडातच अडकून राहिले. वेदग्रंथ अध्ययनाची वस्तु न राहता पूजेच्या वस्तु बनल्या. एवढ्या पुरतेच हे मर्यादित असते तरी ठीक होतं. त्यांची भाष्य करतांना निराधार गोष्टीचा अवलंब करून जाति-भेदाच्या तटबंदी उभ्या केल्या जाऊ लागल्या.

"मग...."

"पुराणांची रचना केली, ज्यांचा हेतु होता वेदातील सत्य सद्विचार हे कथांच्या माध्यमातून प्रत्येकाच्या गळी उतरवावेत. तेणे करून बौद्धिकतेच्या उन्मादाचे शमन व्हावे. तथापी....."

"तथापी काय..?"

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

"तो प्रयत्न सुद्धा आंशिक सफल ठरला, सहकाऱ्यांनी स्मृती रचल्या. त्या सर्व बुद्धिमंतांच्या आजीवकेची साधनं बनून राहिल्या. प्रत्येक मनुष्याचं मन बदलण्याचा प्रयत्न अपूर्णच राहिला. बुद्धीत सुधारणा झाली नाही. अहंकार गळला नाही. परिणाम महाभारताच्या युद्धोन्मादाच्या रूपात समोर आला. विज्ञान धनाचे गुलाम, आणि धन दुष्टांच्या हाती कळसूत्री बाहुले बनलं. सारी साधनं धनाच्या भोवती पिंगा घालू लागली. स्वतःला ज्ञानी, विज्ञान, बुद्धिवान व बलवान म्हणवणारी माणसं दुर्बुद्धीचे दास बनले. देशाचं अन् समाजाचं वैभव चक्काचूर झाल. पण हा एकटा चालत राहिलो, प्रयत्नात ढिलाई येऊ दिली नाही". महर्षींच्या स्वरात उत्साह जाणवत होता आणि देवर्षींच्या मुखावर उत्सुकता दिसत होती.

थोडसं थांबून म्हणाले, "महाभारताची रचना केली. मानवी दुष्कृत्यांच्या बीभत्सपणाचं चित्रणं त्यातून केलं. सत्कर्माचा मार्ग दाखवला. मानव ज्या ज्या गोष्टींनी सुधरेल, सावरला जाईल, त्या त्या महाभारतात संकलित केल्या. इतिहासातून बुद्धीनं काही धडा शिकावा म्हणून! पण शेवटी पळसाला तीन पानं."

"तर काय प्रयत्नच सोडून दिला?" देवर्षींनी विचारलं.

"नाही... प्रयत्न का सोडेन? कर्तव्यनिष्ठेचंच दुसरं नाव मनुष्यत्व आहे. एका विचारवंताचं जे कर्तव्य आहे ते शेवटच्या श्वासापर्यंत अखंडपणे करीत राहीन."

"खरंच अशीच निष्ठा हवी."

"हो, तर महाभारताचाही पाहिजे तो प्रभाव पडला नाही असं पाहून विचार केला, कदाचित इतका मोठा ग्रंथ लोकांना वेळेच्या अभावी वाचता आला नसेल, म्हणून अत्यंत लहानशा "ब्रह्मसूत्रा" ची रचना केली. सोप्या व लहान सूत्रांतून जीवन जगण्याची आवश्यक तत्त्वे गुंफली. एकतेचे समतेचे महत्त्व सांगितले. एकाचीच परम सत्ता प्रत्येकात विहित आहे असं सांगून, बंधूभावनेची दिव्यता तुमच्यात आहे सांगून स्वतःला दिव्य बनवा, आपला उद्धार करून घ्या, अशी प्रेरणा दिली. पण या मानवी दुर्बुद्धीला काय म्हणावं ! ती ग्रहणशीलता जशी शिकलीच नाही. पंडितमंन्यांनी त्या ग्रंथावर आपल्या

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

पांडित्याच्या वैभवाचं प्रदर्शन करून नाना प्रकारची भाष्ये लिहिणं सुरू केलं. शास्त्रार्थाच्या आट्यापाट्या खेळणं सुरू केले. जीवन जगण्याच्या सूत्रांचा तो ग्रंथ तात्विक वादांचा आखाडा बनून राहिला."

"आता फिरून समाधानाच्या शोधात आहे. माझे प्रयत्न अपयशी ठरले याचं दुःख नाही तर मानवांचं दुःख नि दुर्गती पाहवत नाही, ही व्यथा आहे. असह्य बेचैनी आत आहे. पण काय करावे?

"या अंधारात कुठं प्रकाशाचा किरण दिसत नाही." असं म्हणत वेदव्यास आशापूर्ण दृष्टीनं देवर्षींकडे पाहू लागले.

"यावर समाधानकारक उपाय आहे" देवर्षी.

"कोणता?" आवाजात उल्हास भरला होता. जणू सृष्टीचं सारं वैभव हाती आलं असावं.

"भावसंवेदनांचं जागरण... झोपी गेलेल्या आत्म्यांना जागं करणं, असंही म्हणता येईल."

"आणखी विस्तारानं समजावून सांगा."

"तुम्ही मानवी जीवनाची विकृती ओळखली आहे, आता प्रकृतीला आणखी जास्त बारकाइनं निरखून पहा. उत्तर मिळेल."

"कशी असते प्रकृती?"

"प्रकृतीची सारी कार्ये अहं-जन्य असतात आणि बुद्धी, मन आणि इंद्रियं बिचारी तिची गुलाम असतात. मानवी सत्तेचं केंद्र आत्मा होय. ही परमात्म सत्ता रसरशीत सक्रिय आणि उन्नत, उदात्त भाव-भावनांची समुच्चय स्वरूपाची असते. आत्मा त्यांचाच अंश आहे. आत्माच्या जागृतीचा अर्थ आहे उन्नत भावना, दिव्य संवेदनांचं जागरण. केवळ जागृती नव्हे, तर श्रेष्ठ कार्यासाठी सक्रियता, दिव्य जीवनासाठी कृतिपरायणता."

"पण भाव तर कोमल असतात?" महर्षींच्या आवाजात काहीशी संदेहाची भयभावना होती. भावनांविषयी अनास्था जाणवत होती.

"नाही! त्या एकाच वेळी कोमल नि कठोर दोन्ही असतात. सतप्रवृत्तींसाठी कोमल-सौम्यय, त्यांच्यात सुगंध भरणाऱ्या, आणि दुष्प्रवृत्तींबाबत वज्रकठोर, एकाच आघातानं त्यांचा चक्काचूर करणाऱ्या भावनांच्या जागृतीचा पहिला

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

आघात अहंकारावर होतो. अहंकार कोसळून पडताच मन-बुद्धी आत्म्याच्या अधीन होऊन दास बनतात. मन तेव्हा उन्नत व उदात्त कल्पनांत रममाण होऊ लागतं. बुद्धी कल्याणकारक विचारात संलग्न बनते. भावसंवेदनांचं जागरण घडवणं हे एकमेव उत्तर आहे सर्व समस्यांचं, सर्व विकृतीचं. दोन चार व्यक्तींच्या भावनांचं नव्हे, तर साऱ्या समाजाचं भावजागरण! साऱ्या मानव जाती भावनांच उदात्तीकरण!! मन आणि बुद्धीला कुमार्गाकडून काढून सन्मार्गावर लावणं ही शक्ती फक्त भावसंवेदनांमध्येच आहे."

"पण मानवी बुद्धी तर फारच विचित्र आहे. भावनांच्या ऐवजी एखादे वेळी वासना नि कुंठा नाही का भडकणार?" महर्षींची रास्त शंका.

"तुमची शंका निराधार नाही, महर्षी! पण एवढ्याचसाठी भयभीत होऊन मागे हटणंही बरोबर नाही. सावधपणा आणि जागरुकता हवी आहे. भाव कर्मशील कर्मोन्मुख होतील. जगहितकारी गोष्टींवरच भावनांचं केंद्रीकरण व्हावं. तशाच संवेदनांच आवाहन करावं. भावनांचं अमृत संवेदनांच्या पात्रातच ठेवलं जाईल. विवेकाच्या गाळणीनं गाळलं जाईल, तर परिणाम सुखप्रदच होईल. लेखणीनं प्राण फुंका. जनमनाच्या मार्गाला स्पर्श करा. असा की प्रत्येकाची भावसंवेदना उत्कट बनून उचंबळून येईल. आत्मचेतना व्याकुळ बनून उत्स्फूर्तपणाने प्रार्थना करील."

न त्वहं कामये राज्यं न सौख्यं नापुनर्भवम्।
कामये दुःख तप्तानां प्राणिनां अर्तिनाशनम्।।

"जनमानसाचा आत्मा अजून मेलेला नाही, केवळ मूर्च्छित झाला आहे. मूर्च्छित झालेल्या लक्ष्मणाला शुद्धीवर आणून रामकार्यात तत्पर करण्यासाठी संजीवनी हवी आहे. ही संजीवनी म्हणजे भावसंवेदना! देऊ शकाल तुम्ही! देऊ शकाल, पण खात्री बाळगा की स्थिती कितीही गुंतागुंतीची असो, अंधार कितीही काळाकुट्ट असो, आत्म्याच्या दिव्य संवेदनांचा प्रकाश त्याचा विध्वंस करण्यास समर्थ होईल!"

भावचेतना जागृत व उत्कट होताच मानव पुन्हा एकदा सिद्ध करील की आपण ईश्वराचे राजकुमार आहोत. दिव्य जीवन जगण्याचे अधिकारी आहोत.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

आपण पृथ्वीवरचे देव भूदेव आहोत. पृथ्वीला स्वर्गातूनही श्रेष्ठ करू शकतो. पण...? म्हणत देवर्षींनी महर्षींकडे पाहिलं.

"पण काय?" व्यासांच्या मुखावर दृढता होती.

"तुमच्या बरोबर शिष्य समुदाय सुद्धा या कार्यात सहभागी व्हावा लागेल. तुम्ही निर्माण केलेली संजीवनी प्रत्येकापर्यंत पोहचविण्यासाठी! तुम्ही निर्माण केलेले भावनांचे उदार व उदात्त मेघ दाही दिशांना न्यायला तुमच्या शिष्यांना वायूचे कार्य करावे लागेल. हा भाव सुगंध प्रत्येकापर्यंत जावा लागेल. हे कार्य युगधर्म युगयज्ञ मानतील तरच त्यांना यश लाभेल."

• "सर्वस्वाचा होम करुनही शिष्य परिवार हा युगपरिवर्तनाचा यज्ञ अवश्य पूर्ण करतील." महर्षींच्या बोलण्यात आत्मविश्वास होता."

"तर मग मानव जीवन दिव्य बनण्यास, आजची स्थिती उद्या पालटून टाकण्यास वेळ लागणार नाही. देवर्षी हसून म्हणाले."

"समाधान झालं. उपाय सपडला. उत्तर मिळालं..". वेदव्यासांच्या वाणीत भावविव्हलता जाणवत होती. त्यांनी देवर्षी नारदांना वंदन केलं. ते युगासाठी भागवताची रचना करण्यात गढून गेले. शिष्यांनी भागवताचा प्रसार दूर-दूर पर्यंत करून सर्वांपर्यंत पोहचविलं."

देवर्षी सुद्धा अंतर्धान पावले. आणखी दुसरीकडे कुठे संवेदनांचा अमृत स्त्रोत फुलवण्यासाठी!

◆◆◆

## २. अंतर्दृष्टी उघडली, तर 'चैतन्य' बनले.

समस्यांना कधीच अंत नसतो. संघर्ष, संकटे व भ्रमांचा पेटारा इतका मोठा आहे की त्यास बाहेरुन पाहणाराची गाळणच उडावी व पायावर धारण बसावी. मात्र ज्याला अंतर्दृष्टी प्राप्त होते तो सहज जाणून घेतो की या सर्वांच्या मुळाशी निष्ठुरताच असते. ती दूर झाली तरच समस्या आपोआप दूर होतात, सुटतात. हीच दृष्टी विश्वंभर मिश्र यांना प्राप्त झाली आणि ते 'चैतन्य' महाप्रभु बनले.

त्या काळात ते गया धामात आले होते. निमाईच्या बरोबरच त्यांचा

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

कीर्तिसुगंध सुद्धा आला होता. त्यांना पाहताच लोक म्हणायचे- अरे हे तर नवद्वीपाचे तेच निमाई आहेत, ज्यांच्या पांडित्याचा दरारा साऱ्या बंगालभर पसरला आहे. नुकतेच काही दिवसांपूर्वी त्यांनी काश्मीरी पंडितास शास्त्रात इतके निरुत्तर केले होते की तो पंडित तर पळून गेला. शास्त्रार्थात त्यांचा कोणी हात धरू शकत नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती, आणि तितकीच तोंडे! आणि या सर्वांच्या मध्ये असूनही निमाई पंडित एकरस वाटत. प्रशंसकांची वाहवा आणि निंदकांची निंदा ही प्रसिद्धीच्या शिखरावर पोहचलेल्या थोर पुरुषांची संपत्तीच असते. याहून अधिक लोक त्यांना काय देऊ शकतात तरी?

गया धामात राहणाऱ्या ईश्वरपुरी या संताने हे सर्व किस्से ऐकले. ऐकीव-सांगीव गोष्टी बहुधा अतिरंजितच असतात. तरीही त्यांना वाटले की या व्यक्तीजवळ अवश्य प्रतिभा असली पाहिजे. ती प्रतिभ जर भावसंशुद्धी व श्रद्धेशी समन्वित झाली तर? या विचाराने ते त्यांच्याकडे जायला निघाले. मार्गात विचार करीत होते.... तर तो लोकांच्या जीवनाला वळण देत राहून अनेकांना मार्गदर्शनही करू शकेल. प्रतिभा म्हणजे शरीराची आणि मनाची अत्युच्च क्रियाशीलता आहे. भावशुद्धीचा आधार न लाभला तर प्रतिभा ही अहंकाराची दासी बनते. अहंकाराचा ध्वज उंच उभारण्यासाठीच ती वैभव-विलासाची जमवा-जमव करीत राहते. पण उदात्त उन्नत भावनांशी प्रतिभा जुळली तर सारी स्थितीच उलट होते. मग तर अंतरातील तळमळ व अस्वस्थता त्यास "सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय" कार्य करण्यास भाग पाडते...."

या विचारांच्या तंद्रीतच ते निमाई पंडितांच्या मुक्कामाच्या ठिकाणी केव्हा पोहचले कळलेच नाही. एकाजवळ विचारपूस केली, बंगालचे निमाई इथंच उतरले आहेत काय?

"होय, इथंच जवळच्या मठात ते आहेत" उत्तर मिळाले.

"आत जाताच दिसले की एक गौरवर्ण युवक शास्त्रचर्चा करीत आहे. ईश्वरपुरी सुद्धा एका कोपऱ्यात जाऊन बसले. शास्त्रचर्चा सुरुच होती. चर्चा संपली तसे एक एक श्रोते उठून गेले. केवळ ईश्वरपुरीच एकटे थांबले होते."

युवकाने त्यांना पाहून विचारले, "आपले काय प्रयोजन आहे?"

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

"एक जिज्ञासा आहे"

"विचारा....."

"आपण खरोखरच शास्त्रांचा अर्थ जाणता काय?"

ऐकताच त्या युवक श्रोत्याला आश्चर्याचा धक्का बसला.

म्हणाला "काय म्हणायचं तुम्हाला?"

"आपण वाईट वाटून घेऊ नका मला असं म्हणायचं आहे की आपण जो शास्त्रार्थ व व्याख्या करता ते केवळ बौद्धिक कौशल्य आहे की त्याबरोबर आपली स्वानुभूती सुद्धा निगडित आहे?"

ऐकणारा युवक गप्प होता. आज प्रथमच कोणी तरी त्याच्या बुद्धीवर आसूड उगारला होता.

"महंमद घोरी, गजनीचा सुलतान , कुतुबुद्दीन ऐबक यांनी भारतभूमी केवढी तुडवली? बख्तियारने बंगालवर केवढे अत्याचार जुलूम केले! आज माणसाचा आत्मविश्वासच हरवला आहे. आपण सुद्धा काही करू शकतो याचाच त्यास विसर पडला आहे. इतरांचे अन्याय नि अत्याचार सहन करण्याची आता त्याची सवय बनली आहे. अशाही दशेत आपण केवळ वादविवादाचे कौशल्यातच मग्न आहात? हे केवढे घोर विडंबन आहे!" संतांचे सहज उद्‌गार बाहेर पडत होते.

गौरवर्ण युवकाला त्या शब्दांनी स्पर्श केला होता. त्याला उत्कटपणे जाणवलं की ही कुशल सफाईदार शब्दांची गुंफण नाही, तर त्या शब्दांमधून संताची वेदना पाझरते आहे. त्या शब्दांनी निमाईचं हृदय घुसळून टाकलं. स्मशानात जळणारी प्रेतं पाहून आपणालाही आपल्या मरणाचे भान होत असतं. विवाहांचा धुमधडाका पाहून जीवन किती मधुर नि रसरंगपूर्ण आहे, जाणवतं. त्याच प्रकारे त्याच्या हृदयात मानवतेसाठी करुणार्द्र वेदना आहे, ज्याचं हृदय राहून राहून मानवतेसाठी हंबरडा फोडतं, आक्रोश करतं, तेच इतरांमध्ये तो वेदना फुलवू शकतात.

युवकाच्या डोळ्यांवर आलेला पांडित्याचा मोतीबिंदू विरु लागला. न राहवून तो म्हणाला, "आपण म्हणता ते बरोबर आहे; पण उपाय काय?"

"माणसाला त्याची हरवलेली माणुसकी परत शोधून दिली पाहिजे. त्याच्या

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

मर्माला हात घातला पाहिजे. भावचेतना नसली तर जिवंत मनुष्य सुद्धा प्रेत असतो. ते स्वतःच सडत जाते आणि वातावरणाला सुद्धा दुर्गंधित करुन सोडते. ती असली तरच मनुष्य समर्थ नि सुंदर बनतो. दुःखाच्या नि पतनाच्या निवारणासाठी धाव घेतो. मुडद्याचे काय आहे? त्याची तर ओळखच होते निष्क्रीयता नि निष्ठुरतेवरुन. प्रेताला जवळ रडणारांचे करुण विलाप सुद्धा ऐकू येत नसतात. आज चारी दिशांना अशा मुडद्यांचीच आरास दिसते. त्यांना तुम्ही जिवंत करु शकाल?'' ''ते कसे?''

''भाव-श्रद्धा जागृत करून''

. ''पण समस्याच बुद्धीच्या आहेत तर त्यांचे निराकरणही बुद्धीने व्हायला नको काय? म्हणतात ना, लोखंडाला लोखंडच कापते.''

''बरोबर आहे तुम्ही म्हणाला ते. पण गरम लोखंडाला थंड लोखंडच कापत असते. दुर्बुद्धी ही दाहक तप्त लोखंडासारखी आहे तर भाव त्यांना विकसित, शुद्ध, डौलदार व कामासाठी उपयुक्त बनवणारे थंड लोखंड होय. हेच आहे एकमेव निदान!''

निमाई जाणू एक एक शब्द हृदयात साठवित होते. त्यांच्या मुखातून सहजोद्‌गार बाहेर पडला. आज शास्त्रांचं मर्म सापडलं. आतापर्यंत मी प्रेत होतो. तुम्ही माझ्या चैतन्य आणलं. असं म्हणत त्यांनी गुरुचरणांची पदधूळ मस्तकास लावली. गुरु-शिष्य दोघांचं हृदय भरून आलं होतं. आता एकाचं दुःख हे दुसऱ्याचं बनलं होतं.

निमाई नदियास परतले. त्याचं जीवन इतक बदललेलं पाहून सर्वच चकित झाले होते. एक दिवस रस्त्यात एक कोळी मनुष्य भेटला. सर्वच त्याला पाहून तिरस्काराने तोंड वेंगाडत होते. चैतन्यांना गुरुवचनाची आठवण झाली. ''प्रेतांना इतरांचा करुण विलाप ऐकू येत नसतो. इतरांचं दुःख दिसत नसतं. प्रत्यक्षाला प्रमाण कशाला हवं? खरंच ती सारी प्रेत आहेत. त्यांनी त्या रोग्याला उचललं. त्याच्या जखमा धुतल्या. औषध लावलं जखमांवर. सेवाकार्याबरोबरच त्यांनी संकीर्तन मंडळी जमवली. मुडद्यांमध्ये प्राणसंचार करु लागले. एका चैतन्याने अनेकांना चेतना दिली.

जे इतर जागृत झाले त्यांनी आणखी इतरांमध्ये चेतना जागविली. निमाई

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

बरोबर निताई, श्रीनिवास, गदाधर यासारखे अनेक येऊन मिळाले. शके १४५५ पर्यंत त्यांचे संकीर्तन आणि मानवसेवा सतत सुरू राहिली. सर्वांनांच पटले व मान्य करावे लागले की भावश्रद्धेच्या प्रकाशातच मनुष्य आपली हरवलेली माणुसकी मिळवू शकतो.

हरवलेली माणुसकी पुन्हा लाभली, याचं एकच लक्षण आहे. मनुष्य तोच जो मनुष्यासाठी मरेल. तसं मरतात तर सर्वच. पण सबंध जीवन विटा-दगड माती नि कागद जमा करण्यातच खपतात. त्यांना भूतं-खेतं म्हटलं तर वावगं होणार नाही. ती स्मशानात व कब्रस्तानात जागा अडवून बसतात आणि तिकडून येणारा-जाणारांना भयभीत करीत असतात. मनुष्य अशा वाईट गोष्टी का करील? संवेदनाशून्य बनलेल्यांची स्थिती प्रेतांसारखी असते आणि संवेदनाशीलांची स्थिती जिवंत नि जागृत माणसांसारखी!

यातून कुणाची निवड करायची. हे आमच्यावर अवलंबून आहे.

◆◆◆

## ३. जागृत संवेदनेने स्त्री वर्गाची चेतना प्रखर बनली

संत मिराबाईंनी जिवंत मनुष्य व्हायचं ठरवलं. आणि त्या कसोटीवर स्वतःला शुद्ध सोनं असल्यांच सिद्ध केलं. ती चितोडची राजराणी होती. वैभव, उच्च पद, सत्ता, सन्मान आणि जे जे इच्छा करावं ते ते सर्व तिच्या पायाशी लोळण घेत होतं. नव्हती फक्त एकच गोष्ट - मानव कल्याणासाठी काही करण्याचं स्वातंत्र्य, खोटी प्रतिष्ठा, समाज-प्रथांचा उदोउदो करीत तिचा दीर, नणंद, संपूर्ण राज परिवार तिचा आत्मा मारू पाहात होते. त्यांनी सर्व काही मान्य केले. पण एकच गोष्ट त्यांना मान्य नव्हती ती म्हणजे मीराबाईंने जगात प्रकटपणे भ्रमण करून  जनक्रांतीची बीजे पेरावी, स्त्रीवर्गात जागृती घडवून आणण्यासाठी तिनं प्रकाशदीप बनावं,.... हे त्यांना साफ नामंजूर होतं.

प्रेत आणि मनुष्यांचे सारं काही उलटं असते. प्रेतांना अंधार आवडतो, मनुष्याला प्रकाश. एकाला इतरांना भयभीत करायला आवडतं., तर दुसरा इतरांना प्रेम देऊन सहकार्य करू पाहतो. पहिल्या म्हणजे प्रेतांच्या झुंडीत

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

दुसरा राहणं म्हणजे दुःखद स्थिती होय. एकीकडे प्रखर विरोध, तर दुसरीकडे हृदयाची व्याकुळता, तळमळ. मीराबाईच्या मनावर प्रचंड ओझं होतं. त्याची प्रचीती एखाद्या समदुःखी माणसालाच होऊ शकेल. म्हणून ती राजमहालात राहून कोंडलेल्या पक्षाप्रमाणे करुण विलाप करायची.

घायलकी गति घायल जाणे, कि जिण घायल होय।
सूली ऊपर सेज पियाकी किस विध मिलना होय।।
हे री! मैं तो, दरद दिवाणी, मेरो दरद न जाणे कोय ।। धृ।।

मीरेची व्यथा-वेदना रुढिपरंपराने पुरते जखडून टाकलेल्या समाजासाठी होती. तिचं दुःख समग्र स्त्रीजातीसाठी होतं. करुणा उचंबळते त्याची एकच कसोटी असते. आपल्या सुख-सोयी, गरजा विसरणं नि इतरांची आवश्यकता जाणवणं. करुणा नसेल तर वाळलेल्या लाकडाला चिरणं, आणि एखाद्या भोळ्या-भाळ्या माणसाला पायदळी तुडवणं यात काहीच भेद राहात नाही. पण तिचं हृदय तर करूणेनं ओथंबलेलं होतं. तिनं कठोर बनून राजमहालाची, गढीची, समाजाची सारी बंधन तोडली. राजवैभवाला ठोकर मारली. भाव-भावनांची संजीवनी घेऊन तिने घराबाहेर पाऊल टाकलं, अगणित जनांमध्ये प्राणसंसार करण्यसाठी!

त्या काळात ती घरातून बाहेर पडली होती. घरोघर ती जायची, नि सांगायची स्त्री-पुरुष प्रत्येक बाबतीत समान आहेत. स्त्रिया तिच्याकडे आश्चर्यचकित होऊन अभिमानानं पाह्यच्या. एके दिवशी राजस्थानची एक महिला केसर बाई हिनं मीरेस विचारलं,

"बये, हे पुरुषांचं काम कां करतेस तू?"

"हे पुरुषांचं काम आहे?"

"नाही तर काय...?"

"खर सांगायचं तर हे स्त्रियांचं काम आहे ?"

"ते कसं....?"

"उत्कट भावनाशीलता हा स्त्रीचा स्वभावविशेष आहे. तिच्यात देण्याचीच प्रवृत्ती असते. स्वार्थाला ठोकर मारून सारं काही इतरांच्या कल्याणात लुटवून

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

देणं, केवळ तिलाच शोभू जाणे. हा तिचा स्वभावतःच गुण आहे. म्हणूनच तर प्राणांचे दान करून मुलाला जन्मास घालते. अमोल कष्ट सहन करून कुटुंबाची सेवा करते. कुटुंबाचे संघटन घडवते. गरज आहे एवढीच की तिचं हे कार्य मर्यादित न राहता व्यापक व्हावं."

"खरचं आहे! केसर बाईला वस्तुस्थिती जाणवली होती."

तिच्या जीवावर उठणारी कपट-कारस्थाने सुरू होती. सापाचा पेटारा, विषाचा पेला, सर्व प्रकारचं डावपेच टाकले गेले. पण दैवी चेतनेचं संरक्षण या सर्वांवर मात करण्याइतकं शक्तिशाली होतं. तिनं लिहून पाठवलं.

"थारी मारी न मरूँ। मेरो राखणहारा और!"

मीराबाईस कितपत यश लाभलं, हा प्रश्न महत्त्वाचा नाहीये, आंतमध्ये इतराचं दुःख-पतन पाहून ते दूर करण्यासाठी बेचैन होणं, क्रियाशीन बनण्यासाठी पावलं पुढे पडणं- हेच असं यश आहे ज्यावर हजारो यशांना ओवाळून टाकावं.

विक्रतसंवत १६३० पर्यंत संत मीराबाई जिवंत होत्या. केवळ श्वास होत्या म्हणून नव्हे, तर विझलेल्या दिव्यांना पेटवून नवज्योति संचार करणाऱ्या दीपासमान जिवंत होत्या. घरोघर जाऊन आपली करूणा वाटत राहिल्या. प्रत्येकाच्या अंतरात करुणा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत राहिल्या.

◆◆◆

## ४. सक्रिय समर्पण कसं असतं?

वेदना, करूणा निर्माण होते तेव्हा तिचे एकच लक्षण असते की विकासाविषयी अनासक्ती उत्पन्न होते व भोगपरायण जीवनाचा पूर्णपणे त्याग होतो. जीवनातील हौस-मौज आणि चित्रविचित्र भोग त्यास आकर्षू शकत नाहीत. नवतरूणी अंडालच्या हृदयात असाच भावावेग व कारूण्य उद्‌भवले. घरात वडील, सखे-सोयरे सर्व विवाहासाठी तिच्यावर दडपण आणीत होते. तिने विचारले, "विवाह का करायचा...?" "घरसंसार बसवायला....?"

"तर आता कुठे घर उजाड झाले आहे? "

"नवीन घर स्वतःचा संसार सुरू करण्याची गोष्ट आहे."

"म्हणजे विवाहाचा अर्थ घर थाटणे!"

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

"होय."

"इतकी घर उजाड बनताहेत, स्वतः भगवंताचं घर मोडकळीस येतं आहे. अशा स्थितीत नवीन घर बसविण्याचा विचार करणं किती मूर्खपणाचं आहे! घरच बसवायचं तर याच घराला का नाही चांगलं करायचं?" तिचा तर्क.

यावर घरच्या मंडळीजवळ कोणतंच उत्तर नव्हतं. तिने स्पष्ट सांगून टाकलं की तिचा विवाह भगवंताशीच झाला आहे. एकमेव भगवंत तिचा पती आहे.

कुटुंबियांच्या मनात अजूनही एक अंधुक आशेचा किरण होता की कदाचित ती घरी बसूनच भजन-पूजन करील.

पण क्रांतिकारकांची पावलं नेहमी विलक्षण प्रकारे पडत असतात. तिने भक्तीची नवीनच व्याख्या केली. जग आणखी दुसरं काही नाहीये, भगवंताचचं विराट रूप आहे. आत्म्याच्या रूपानं तोच प्रत्येकाच्या आत विद्यमान आहे. आत्मचेतना जागृत करणं आणि ते भक्तिभावाचं धन अर्पण करणं हीच भक्ती आहे.

समर्पण निष्क्रीय का व्हावं? आत्मचेतनेच्या उत्कट भावनांचा प्रत्येक अंश, मनाचा सारा विचार, शरीराची प्रत्येक हालचाल जेव्हा विश्वरूप नंदनवनाला सुखद नि रमणीय बनविण्यासाठी उचंबळत असेल, तेव्हा समजावं की समर्पणाची दिव्य क्रिया सुरू झाली आहे.

तो काळ मध्ययुगाचा सुरुवातीचा होता. तिने आपल्या भक्तिपूर्ण प्रयत्नांनी अलवारांमध्ये नवचेतना निर्माण केली. स्पष्ट शब्दात ती सांगायची- "भक्त तोच की ज्याला प्रत्येक जीवाचं दुःख स्वतःचंच वाटू लागते. नाहीतर तो विभक्त समजावा. भगवंतापासून सर्वस्वी अलग, दूर, भगवंत हत्तीला मगराच्या मिठीतून सोडवायला नंग्या पावलानं धावत येतो, जखमी होऊन पडलेल्या जटायु गिधाडाला उचलून आपल्या मांडीवर घेतो आणि स्वतःला भक्त म्हणवणारा पर-दुःखाची अनुभूती स्वतःमध्ये घेत नसेल तर तो कसला भक्त?"

अलवारांची मंडळी घेऊन ती घराबाहेर पडली. उदात्त भावनांना वाणी लाभली व त्या इतरांचं अंतःकरण भक्तिभावांत रंगवू लागल्या. वाणीच नव्हे, तर तिनं लेखणीही उचलली. "तिरुप्पावै" काव्याची रचना केली. त्याच्या

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

प्रत्येक शब्दातून करुणा पाझरते आहे. या काव्यातून तिनं सिद्ध केलं की जिला शांती म्हणतात ती निष्क्रीयता नसून क्रियाशीलतेची उच्चतम अवस्था असते. भोवरा पूर्ण वेगात फिरतो तेव्हाच तो शांत नि स्थिर वाटतो.

कोवरीच्या तटवर्ती संपूर्ण क्षेत्रास तिनं ढवळून काढलं. स्वतःच्या आणि सहकाऱ्यांच्या समन्वित प्रयत्नांनी प्रत्येकाच्या अंतरात निद्रिस्त दिव्य भावनांना तिनं जागं केलं, विकसित केलं. भक्तिपूर्ण भाषेत ती प्रत्येकाला सांगायची, "क्षीरसागर तुमच्या प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे. त्या शेषशायी नारायणाला जागं करा. मग पहा, तुमचं स्वतःच घरच वैकुंठ बनेल." विजयनगरच्या साम्राज्याच्या सुवर्णकाळ हा तिच्या अथक परिश्रमांची फलश्रुती होती. नंतरच्या काळात कृष्णदेव राव महाराजाने "अभुक्त माल्दम्" हे काव्य रचून तिच्या चरणी आपली श्रद्धांजली अर्पण केली आहे.

◆◆◆

## ५. संकल्प बदलताच क्रौर्यही बदललं!

ज्याने आपल्या जीवनात करुणेची ही दिव्य संपदा प्रत्यक्ष आचरणात आणली असेल त्यालाच श्रद्धांजली अर्पण करीत असता. त्याचे जीवन पाहून इतरांच्या मनातही तशा करुणा भरून जाते. अगदी निष्ठुर माणसाच्या जीवनातही असे प्रसंग येतात आणि त्या क्षणापासून त्याचं अवघं जीवन बदलून गेलेलं दिसतं. जो आजवर इतरांची डोकी फोडण्यातच पुरुषार्थ मानायचा तो उदात्त उत्कट भावनांनी ओथंबून जाऊन इतरांमधील दिव्यत्त्वाला प्रोत्साहन द्यायला तयार होतो. त्यांच्यातली सारी हिंस्त्रता नष्ट होते. इतरांना दुःख देण्याची वृत्ती पार लयास जाते. या दीर्घ तपस्येने तो भावनांची प्रतिमा बनतो. लक्ष लक्ष जनांना त्याच्यातली हे विलक्षण परिवर्तन प्रभावित करीत असते. प्रत्येक जण आश्चर्यचकित व हर्षनिर्भर होऊन म्हणतो "अरेच्या! हा परपीडा देणारा आता इतरांच्या जखमांवर मलमपट्टी करू लागला आहे. जाऊन पाहून या, आणि आपणही अशी कला शिकू या" सर्व जनता येऊन मथा टेकते, फुलं उधळते आणि आशीर्वाद मागत असते. यावर तो सर्वांना एकच गोष्ट सांगतो. "माझ्याकडे पहा, प्रत्येक क्षण हा परिवर्तनाचा पवित्र

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

क्षण होऊ शकतो, पर्वणी बनू शकतो. याच क्षणापासून बदलायला तुम्ही सुरूवात करा."

अशोकाच्या जीवनात असाच एक चमत्कारपूर्ण क्षण आला. त्यावेळी अशोक महान नव्हता, तर तो होता चण्ड अशोक अत्यंत कठोर व निर्दय. दृश्य होते कलिंग युद्धाच्या शिबिराचे. आज त्याने विजय मिळवला होता. त्याचा विजयोत्सव साजरा होत होता. अहंकाराच्या आणि सत्तेच्या नशेत धुंद बनलेले सैनिक आणि सेनापती इकडे मिरवत होते. याच अवधीत सम्राटाने महासेनापतीला बोलाविले. तो काही क्षणातच हजर झाला.

"सेनापती! युद्धकैदी किती आहेत?"

"....फक्त एक"

"एक!..." अशोकास मोठंच आश्चर्य वाटलं ऐकून.

"कलिंग युद्धात शेवटी किशोर आणि वृद्धांनी सुद्धा तलवार हातात घेतली होती, महाराज!"

"काय? त्यांनी सुद्धा!"

"होय!"

"मग तर कलिंगात फक्त स्त्रियाच उरल्या असतील?"

"त्या सुद्धा जिवंत राहिल्या नाहीत!"

"का?"

"कारण, शेवटच्या लढाईत आम्हाला त्यांच्याशी लढावे लागले"

"अरेरे!...." तो चिंतातुर झाला होता.

"ठीक. युद्धबंदीला हजर करा."

"जशी आज्ञा, महाराज!"

थोड्याच वेळात एक लंगडा, चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेला वृद्ध समोर होता.

"तर तूं आहेस!"

"होय, मीच आहे तुमच्या विजयाच बक्षीस." वृद्धाच्या वाणीत रोष होता.

"विजयाचं बक्षीस? आणि तू?" म्हणत सम्राट हसू लागला.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

"तेव्हा माझ्या शौर्यापुढे कलिंगवासी लोक टिकू शकले नाहीत. काय सेनापती?" समोरच्या सेनापतीकडे पाहात अशोक म्हणाला. सेनापती गप्प होता.

"शौर्य नव्हे, क्रौर्य म्हणा" वृद्ध मध्येच म्हणाला.

"क्रौर्य?"

"होय, प्रेतांची लोभी माणसं कधी शूर होऊ शकत नाहीत. कुत्रे, गिधाडे, लांडगे सुद्धा प्रेतं बघून खुश होत असतात. पण त्यांना कुणी वीर नाही म्हणत."

"गप्प रहा...." सम्राट ओरडला.

"कोणी गप्प रहावं? तुमच्या सारख्या निष्ठुरानं, की ज्याच्या रोम-रोमातून दुःखाचे कढ उकळताहेत त्यानं?" वृद्धाच्या हसण्यात उपहासाचं दाहक विष प्रकट होत होते. पुन्हा तो म्हणाला, आपले क्रौर्य युद्धभूमीत जाऊन पहावं. तिथं माझ्या सारखी आणखी कित्येक भेटतील.

"या म्हाताऱ्याला इथून बाहेर न्या पाहू!" रागावून सम्राट म्हणाला. सम्राटाच्या रागाचा वृद्धावर काहीच परिणाम दिसला नाही. तो जाता जाता म्हणाला, "पतितांचं पीडितांचं दुःख दूर करण्याचं नाव आहे वीरता. अशा वीर क्षत्रियांच्या बाबतच म्हटलं आहे. "क्षत्रियाः त्यक्त जीविताः" ते इतरांच्यासाठी स्वतःच्या जीवनाचा मोह सुद्धा त्यागतात. तो हसती-खेळती जीवने नष्ट करतो तो तर क्रूर आहे, उन्मादी आहे." शिबिराच्या बाहेर पडतांना त्या वृद्धाचे हे शब्द अशोकाच्या कानांवर घणासारखा आघात करून गेले.

रात्रभर तो अतिशय बेचैन होता. वीरता नि क्रूरता यांची व्याख्या त्याच्या हृदयाला घरे पाडीत होती. तर काय आपण वीर नव्हेत? मग वीर म्हणून घेण्यासाठी आपण केलेलं सगळं..? प्रश्न शून्यात विलीन होत होता. त्यावर काहीच उत्तर नव्हतं.

दुसऱ्या दिवशीच उजाडताच तो म्हणाला, "कालच्या त्या वृद्धाला बोलवा" सैनिक धावतच गेले त्या म्हाताऱ्याकडे. मागच्या पावली परत आले. ते खाली हाताने परतले होते. माना खाली घालून.

"काय झाले?"

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

"तो मरण पावला, महाराज!"

"अरेरे!"

थोड्याच वेळाने सेनापती आला आणि त्याने सांगितले की वैद्यराजांनी तपासणी केली त्याची. मानसिक दुःखाचा अति असह्य धक्का बसून त्यास मृत्यु आला, असं वैद्य म्हणाले.

"तो सुद्धा गेला, ना!" अशोक पुटपुटला.

दुपारी अशोक आपल्या मंत्री, सैनिक व अधिकाऱ्यांसह युद्धभूमीवर गेला होता. तिथं भयाण शांतता पसरली होती. होती फक्त प्रेते, हत्त्यांची, घोड्यांची, माणसांची आणि स्त्रियांची. तुटलेले रक्ताळलेले हात, पाय इकडे तिकडे परसले होते, कुत्रे, कोल्हे, लांडगे, गिधाडे यांना चांगली मेजवानी मिळत होती. ते खुशीत प्रेतांची कुतरओढ करीत होते.

त्याच्या कानात राहून राहून त्या वृद्धाचे शब्द घुमत होते. किल्ल्याच्या आत शिरले तर तेथे राखेचे ढिगारे दिसले. हाच त्याचा विजय होता. स्मशानावर विजय ! आता तो कोणावर राज्य करणार? प्रेतांच्या ढिगाऱ्यावर? त्याची अस्वस्थता दर क्षणाला वाढत होती. सम्राटाच्या आत निद्रिस्त आत्मचेतना आळस सोडून आळे-पिळे देऊन जागृत होत होती.

तो शिबिरात परत आला. त्याला सात वर्षा पूर्वीचं दृश्य आठवत होतं. एक-एक स्मृति-चित्र मनावर तरंगून जात होतं. आपल्याच भावांशी लढून भीषण नरसंहार त्याने केला होता. भयानक विध्वंस घडवला होता, हसणारांना दुःखानं रडवणं, मरणारांना मारणं- हेच होतं आजवर त्याचं शौर्य! हेच आजवरचं कर्तृत्व. आणि या भांडवलावर तो आपण वीर आहोत अशी प्रौढी मिरवत होता. पण आता...?

छावण्या उठत होत्या. तो मगधाकडे निघाला होता. पण मनात परिवर्तनाचा संकल्प घेऊन परत जात होता. क्रौर्याचं परिवर्तन शौर्यात करून परत जात होता. ना त्याला वृद्धाची विस्मृती होत होती, ना कलिंगाच्या लाखो जनांच्या आक्रोशाची, करुण विव्हळण्याची, नि सर्वनाशाची. ती रक्ताची नदी बनलेली रणभूमी. ते जखमींचे आर्तनाद, किंकाळ्या! अंतरांतली अस्वस्थता क्षणोक्षणी वाढत होती.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

मगधास पोहचल्यावर त्याने आचार्य उपगुप्तांना बोलाविले. आचार्य आले. त्याचा पहिला प्रश्न होता- "वीरता आणि क्रूरता यांचा भेद कोणता?"

"दुःखातून कष्टातून लोकांना वाचवणं, त्यांना सुख देत असताना प्रसंगी आपल्या प्राणांचा मोह सुद्धा सोडून देणं याचं नाव आहे वीरता. आणि क्रूरता...." आचार्यांनी त्याच्या मुखाकडे बघितलं थोड थांबून म्हटलं, "वसलेली गावं उध्वस्त करणं, उभी पिकं शेतात जाळून टाकणं, शोषण उत्पीडनाचं दमनचक्र सुरू करणं याचं नाव आहे क्रूरता." किती साम्य आहे त्या वृद्धाच्या नि आचार्यांच्या या कथनात! अशोक मनाशीच विचार करीत होता. "आचार्य! मी वीर बनू शकतो?" सम्राटाच्या स्वरात पश्चात्तापाचा दाह होता.

"होय, का नाही?" आचार्यांच्या वाणीत आश्वासन नि मृदुता होती.

"पण कशा प्रकारे?" आता त्याला उत्साह निर्माण झालेला जाणवत होता.

"अंतःकरणाचे दिव्य भाव जागवून! ते जीवनात प्रत्यक्ष दैनंदिन आचरणात व व्यवहारात उतरवून."

"कोणती लक्षणं आहेत या भावजागरणाची?"

"उदार आत्मीयता, आपलेपणाचा विस्तार करणं. मग कुणीच परका वाटत नाही. तेव्हा दुसऱ्यांची दुःख, कष्ट पाहून मनुष्य उदासीन व निष्क्रिय राहू शकत नाही. आपोआप त्यांच्याकडे पावलं वळतात, हात सेवेसाठी पुढे जातात.... एक लक्षण आणखी आहे?

"ते कोणतं?..?" आवाजात जिज्ञासा होती.

"आपल्या जीवनाचा स्तर सामान्य प्रजेसारखा झाला की नाही? मनातल्या कुठल्या तरी कोपऱ्यात अजूनही वैभव मिळवण्याची लालसा, सुखसोयींची वासना, मोठेपणाचा मिरवण्याची, इतरांवर धाक, दहशत वा वचक बसवण्याची पुसटशी इच्छा मनात असली तरी समजावं की भावसंवेदनांचा स्त्रोत अजूनही उघडलेला नाही."

"भावनांचे निर्झर खुलावेत आणि अखण्डपणे वाहावेत, यासाठी काही उपाय नाही काय?"

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

"होय, का नाही असणार?"

"कोणता?"

"स्वाध्याय नि सत्संग, युगावतार भगवान तथागतांचे विचार अंतःकरणात मुरवून टाका. ज्यांनी ते विचार-चिंतन आपल्या जीवनात उतरवलं आहे अशांची संगत करा. दररोज न जमलं तरी आठा दिवसांतून एकदा का होईना. अशा परिव्राजकांची मोठ्या प्रमाणावर जडण-घडण केली जातेय की जे गावोगाव घरोघर जाऊन जनमनात युगभावनांची पेरणी करतील. त्यांच्या अंतःकरणास स्पर्श करून त्यात युगप्रवाह ओतप्रोत भरतील. युगसंवेदना जागृत, उदात्त नि प्रखर बनवतील." आचार्यांच्या उपदेशाचं मर्म ध्यानात आलं. अशोकाच्या उत्साहाला उधाण आलं होतं. चंड-अशोक आता महान अशोकाकडे वाटचाल करीत होता. त्याला उत्कटपणे कळून चुकलं की करुणेत दिव्यता असते, नि महत्त्वाकांक्षांत मलिनता! दोन्ही परस्पर विरोधी होत जिथं एक असेल तिथं दुसरी राहणे कठिण, नव्हे अशक्यच. एकीची प्रेरणा आहे की आपला कण नि कण जनसेवेत झिजवावा, तर दुसरी शिकवते की कशा प्रकारच्या चातुर्याने इतरांचं सर्वस्व हरण करून आपल्या नातवंडांसाठी त्या धनाचा संग्रह करावा.

अशोकाने आपल्या जागृत आत्मचेतनेतून राजसी-तामसी आशाआकांक्षांना पार घालवून दिले होते. क्रूरपणास पूर्ण तिलांजली दिली होती. शांति-सद्भावनांच्या प्रसारात तो आता मग्न झाला होता. संपूर्ण साम्राज्यात प्रेमाचे अमृत शिंपडण्यास त्याने सुरुवात केली होती. साम्राज्याचा कारभारच नव्हे तर व्यक्तिगत जीवनाची पद्धतीही बदलली होती. सर्वांनी परावृत्त करण्याचा प्रयत्न करूनही त्याने न जुमानता आपल्या वैयक्तिक गरजा कमी कमी केल्या होत्या. समाजातला सर्वात गरीब मनुष्य जसा राहतो तसाच सम्राटही राहू लागला. ऐतिहासिक पुराव्यांनुसार त्याची व्यक्तिगत संपत्ती होती. एक वस्त्र, एक सुई, केस कापण्यासाठी एक सुरा, एक गाळणी व एक तुंबा. एवढेच पदार्थ त्याच्या बरोबर असत. तो एका शिलालेखात म्हणतो, "मी सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करीन. सर्वांच्या हितात माझे हित आहे. यापासून मी कधीही विन्मुख होणार नाही. जीवनाच्या यशाचं हेच सूत्र

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

होय."

इतके सर्व करूनही त्याला सतत एक चिंता लागून राही की सतप्रवृत्तिसंवर्धनासाठी मी अधिकाधिक काय करू शकेन? एके दिवशी तो स्वतः आचार्य उपगुप्तांजवळ जाऊन विचारू लागला, "मी आणखी काय करावे?"

"संघाच्या संचालनासाठी आपल्या संपत्तीचा एक अंश आणि समाजात प्रत्येकापर्यंत सद्विचारांची गंगा प्रवाहित करण्यासाठी समय, सद्विचारांचा हा प्रवाह अंतस्थलातील कषाय-कल्मष, पापाचारांना धुवून पवित्र करीत असतो. आत्मचेतनेस खडबडून जागे करीत असतो."

"संपत्तीची गोष्ट तर ठीक आहे. पण मी स्वतः आता वृद्ध बनत चाललो आहे. जर आपल्या पुत्रास जनचेतना जागृतीसाठी समर्पण केले तर?"

"अति उत्तम संकल्प आहे!"

राजपुत्र महेंद्र आणि राजकन्या संघमित्रा यांनी आपल्या वडिलांचं बदललेलं व्यक्तित्व पुरेपूर ओळखलं होतं. देवानां प्रिय अशोकची सात्त्विकता व जनकल्याणासाठी त्याची वेदना रात्रंदिवस त्यास कशी सक्रिय बनवित आहे हे त्यांनी उत्कटपणे अनुभवलं होतं.

पित्याच्या आदर्शांवर चालण्यांचं भाग्य पुत्रास लाभत आहे, नव्हे त्यापेक्षाही काकणभर अधिक, याहून श्रेष्ठ भाग्य कोणतं? मुलगा आणि मुलगी यात भेद तो कसला? भाऊ जो करू शकतो, ते बहिण का करू शकणार नाही?

भाऊ आणि बहिण दोघे तयार झाले. समाज पुरुषाच्या चरणी आपला पुत्र आणि कन्या अर्पण करताना त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे होते. पण ते दुःखाचे नसून आनंदाचे अश्रु होते. सम्राटाने या प्रसंगी उपस्थित जनसमूहास उद्देशून म्हटले, "पिता आपल्या संतानांना अवघ्या जीवनाची कमाई वारसा म्हणून देत असतो. मी सुद्धा आपल्या कन्या-पुत्रास आपल्या जीवनाची मुख्य संपत्ती माझ्या हृदयातील वेदना देत आहे. अशी बेचैन करणारी वेदना, जिची प्रचंड ऊर्जा मला सतत सक्रिय बनवित राहते."

"आम्ही धन्य झालो असा वारसा मिळवून!" महेंद्र आणि संघमित्राच्या तोंडून एकाच वेळी उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडले.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

संतान आणि पिता परस्परांपासून दूर गेले. त्यांचा शारीरिक वियोग झाला हे खरे; पण तो खरा वियोग कुठे होता! ते तर भावनांच्या अदृश्य सेतूने अधिकच घनिष्ठ सान्निध्यात आले होते. ख्रिस्त पूर्व इ.स. २३२ पर्यंत सम्राट अशोक हयात होता. शेवटच्या काही वर्षात त्यानेही भिक्षुजीवन स्वीकारून प्रव्रज्या केली. आपल्या कृतीतून सिद्ध केलं की वास्तविक अर्थाने वीरता म्हणजे संवेदनाशील जीवन होय. असं जीवन जे इतरांची दुःख नि कष्ट दूर करण्याची प्रेरणा देते, सेवाकार्यात तत्पर बनविते.

◆◆◆

## ६. संवेदना स्वस्थ बसू देत नसते.

अंतरात आत्मदेव जागा झाला की तो निष्क्रीय बसू देत नसतो. साधने नाहीत, आम्ही असहाय्य आहोत, असमर्थ आहोत, या सबबी आत्मदेवाने आळस झटकताच पळून जातात. नाझरेथच्या येशूजवळ काय होते? त्याचा बाप युसूफ हा गावचा सुतार, आणि आई अशिक्षित पालन-पोषण धनगरांच्या वस्तीत झाले. त्याला स्वतःला फार मोठ्या एम.ए., पी.एच.डी.सारख्या पदव्या मिळवता आल्या नाहीत. तर मग त्याच्यात असे काय होते की तो आत्मप्रकाशाचा महान संदेशवाहक बनू शकला? जसजसा काळ लोटतो आहे तसतसा त्याचा प्रभाव वाढतच आहे. काळ त्याचे यश मलिन वा निष्प्रभ करू शकला नाही.

अनेक अभाव असूनही त्याच्याजवळ अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती करुणेची. आंतरिक संपदा. त्यामुळे निःस्वार्थीपणा, निस्पृहता व त्याग त्यांचे जीवनसाथी बनले. हेच त्याचे सर्वस्व होते. याच्या सामर्थ्यावरच त्याने रडणारांचे अश्रू पुसले, त्यांना सांत्वन दिले. दुःखी कष्टी जनांच्या मुखावर हास्य फुलविले.

एकदा तो समुद्र किनाऱ्यावर फिरत होता, तेव्हा त्यानं पाहिलं की किनाऱ्यावर काही मच्छीमार लोक आपापसात भांडण करीत आहेत. त्याने विचारलं "काय झालं आहे? कशासाठी भांडताहात?" लक्षात आलं त्याच्या की भांडण भाकरीवरून आहे.

"अरे, तुमचं भांडण आता पुरे करा. तुम्ही सर्व आपापल्या भाकरी एका

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

ठिकाणी जमा करा- आणि सर्व बरोबरच जेवण सुरू करा."

सर्वांनी त्याचं म्हणणं मान्य केले. भाकरीच्या ढिगारातून प्रत्येक जण एक एक घेऊन खाऊ लागला. मधूनच तो प्रेमाने त्यांना समजावित राहिला-

"आपणाबरोबर इतरांचाही विचार केला पाहिजे. भाकरीवर उपाशी माणसाचा हक्क असतो. पोट भरल्यावरही ती साठवून ठेवणे हा अपराध आहे, पाप आहे." त्याचा उपदेश ऐकतानाच सर्वांचं जेवण सुद्धा संपलं होतं. पाहिलं तर अजूनही दोन भाकरी उरल्या होत्या. सर्वांनाच आश्चर्य वाटलं. हे कसं शक्य झालं?

त्याने सर्वांना समजावलं- "व्यक्तिगत जीवन असो, की कौटुंबिक, सामाजिक जीवन असो, सर्वत्र समस्यांचे एकच एक कारण आहे. म्हणजे-निष्ठुरता. यावर उपयही एकच एक आहे. सरसता. जीवनात सरसता म्हणजे भावसंवेदना नसेल तर समस्यांची गुंतागुंत अधिकच वाढत जाईल. गुंता सोडवण्याचा दुसरा मार्गच नाही. सर्वांनी यावर होकार भरला. हे येशूचे पहिले शिष्य होते.

त्याच्या उपदेशाची, चमत्कारांची ख्याती दूर दूर पसरत होती. प्रसार इतका वाढला की लोक म्हणू लागले, "तो प्रेतांतही प्राण फुंकतो व त्यांना जिवंत करतो." या म्हणण्यात सत्य होते. त्याच्याजवळ होता भावसंवेदनांनी काठोकाठ भरलेला अमृतकलश. मर्मस्पर्शी वाणीद्वारे अमृतसिंचन करून तो नूतन प्राणांचा संचार करायचा.

एका श्रीमंत युवकाने एकदा येशूला प्रश्न विचारला, "प्रभो! स्वर्गाचं राज्य प्राप्त करून घेण्यासाठी मी काय करू?" त्याने म्हटलं, "तुझ्यात पवित्र आत्मा उतरला नाही. येथून घरी गेल्यावर जीवनोपयोगी वस्तू सोडून सर्व संपत्ती विकून टाक. त्या धनाचा उपयोग समाजाच्या दुःखी कष्टी लोकांची विफलता दूर करण्यात कर. तुझ्या आत-बाहेर स्वर्गाचं राज्य प्रकट होऊन जाईल. हे ऐकून तो धनिकपुत्र उदास, निराश होऊन निघून गेला. अपार संपत्तीचा मोह तो सोडू शकला नाही. येशू हसत हसत सर्वांना म्हणू लागले, "सुईच्या भोकातून एकता उंट निघून जाईल; पण धनाचा साठा करणारा स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करणं अगदी अशक्यच!"

एकदा तो अशा एका गावात गेला जिथे सर्वच लोक अतिशय भयभीत

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

बनले होते. भित्रे-संकोची बनून कसं बसं जीवन जगत होते. विचारपूर करता कळलं की तिथं जेकब नावाचा एक क्रूर मनुष्य आहे. तो दारूचा अड्डा चालवतो. गरीबांना मजुरांना पहिल्यांदा गोडी गुलाबीने दारु प्यायला प्रोत्साहन देतो. मागाहून मार-झोड करून पैसे वसूल करतो. त्याने गावात खूपच दरारा नि दहशत निर्माण केली आहे.

व्यसनांच्या आधीन बनलेल्या लोकांजवळ कोठून पुंजी असणार? पैसा असला तरी तो हळू हळू संपून जातो. तेवढा पैसा गरीब माणसाजवळ असला तर त्याच्या कुटुंबियांना केवढं सुख-समाधान मिळालं असतं! कुटुंबियांना पत्नीला-मुलाबाळांना उपाशी मारून, रोगांत असहाय सोडून व्यसनांच्या नालीत पैसा व शारीरिक शक्ती फुंकून टाकतात. जेकस अशा लोकांना दारू उधार पाजतो, मग मोठ्या निर्दयपणाने पैसे वसूल करतो. याशिवाय सम्राटाने त्याच्यावर कर वसुलीचंही काम सोपविलं आहे. तो टॅक्स वसूलीला निघतो, तेव्हा तर त्याचं रूपच बदलून जातं. हातात चाबूक घेऊन तो फिरतो तेव्हा त्याला पाहून लोक भीतीने लपून बसतात. शेतात जंगलात पळून जातात. जो हाती सापडतो त्याला कठोर यातना सहन कराव्या लागतात.

सर्व भयकथा ऐकून येशू जवळच उभ्या असणाऱ्या शिष्यांकडे पाहून म्हणाले, "एक निष्ठूर मनुष्य शेकडो जनांना नष्ट करतो आहे. एवढीच गोष्ट असली तरी ते भाग्य समजले असते. व्यसनांचे लालची लोक हळू हळू नष्ट होती आणि बायका-मुलांना दारिद्र्याच्या व उपासमारीच्या खाईत लोटून जातील. उपाय एकच आहे, त्याच्यात कसेही करून सरसतेचा संचार केला पाहिजे."

"पण कसे....?" शिष्यांनी विचारले.

"मी स्वतः जेकसच्या घरी जाईन आणि त्याच्यातली निद्रिस्त व कोरडी बनलेली मानवीय संवेदना जागवीन."

"तुम्ही?" सर्व डोळे विस्फारून त्यांच्याकडे पाहू लागले.

"मी नाही, तर मग कोण...?"

यावर कोणीच काही उत्तर दिलं नाही.

जेकसला ही कुणकुण लागली की येशू आपल्या भेटीस येत आहे, तोच

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

त्याने जंगलात जाणे सुरू केले. येशूस भेटण्याची त्याची इच्छा नव्हती. त्याच्या चुंबकीय व्यक्तित्त्वाबाबत आतापर्यंत बरेच ऐकले होते. येशू त्याच्याकडे आले, तो त्यांना कळलं की जेकस रानात निघून गेला आहे. येशू कुठे मानणार होते? तेही रानात त्याच्या मागावर निघाले तेथेच जाऊन पोहचले... जिथं जेकस होता. त्याने त्यांना पाहिलं तर त्याला आश्चर्य वाटलं. आश्चर्य तर तेव्हा परमावधीला पोहचलं जेव्हा येशूंनी त्या निष्ठुराला हृदयाशी कवटाळलं. तो तर हतबल बनला होता. त्यांनी त्याला एका झाडाखाली बसवलं आणि त्याच्या क्रौर्याचं इतकं काही हृदयद्रावक वर्णन केलं की त्याची निष्ठुरताही विरघळून गेली. त्यास ते म्हणाले, "जर कल्पना करून तू मरा की अशीच दयनीय अवस्था तुझी नि तुझ्या मुलाबाळांची झाली तर तुला कसं वाटेल?"

येशू एकटक त्याच्या डोळ्यात दृष्टी गडवून पाहत होते. जैकसने दृष्टी खाली टाकली. काही क्षण गप्प राहून मौनभंग करीत तो म्हणाला, "प्रभो! आतापर्यंत मी आंधळा होतो. आपण मला दृष्टी दिलीय. मी कधीच या प्रकारे विचार केला नव्हता. आजपासून तुम्ही म्हणाल तेच करीन. माझी सारी कमाई गोरगरीगांबाना वाटून देऊन त्यांची सेवा करीन."

विलक्षण चमत्कार होता तो! झाडाच्या आड उभे राहून शिष्य ते दृश्य चकित होऊन पहात होते. झाडाआडून निघून ते येशूच्या समोर आले व चकित होऊन म्हणाले, "प्रभो! हा चमत्कार कसा घडला!" ते स्मितपूर्वक म्हणाले, "पवित्र आत्म्याच्या अवतारणाने! हा 'होली घोस्ट' आणखी काही नसून जागृत भावसंवेदनाच होय. ती कुणात निद्रिस्त, कुणात जागृत असते, तर कुणात सम्मोहित! जागृत आत्म्यांचे कर्तव्य आहे की त्यांनी इतरांना जागं करावं."

इतकं बोलून त्यांनी त्याच्या गळ्यात क्रॉस घातला. त्याचे मर्म समजावून सांगितलं. "हृदयावर लटकणारा हा क्रॉस याचं प्रतीक आहे की आमचं हृदय आदर्शवादी भावांनी ओतप्रोत भरलं आहे. इतकंच नव्हे तर याच्यासाठी आम्ही वाटेल ते कष्ट झेलण्यास तयार आहोत. प्राणांची आहुती सुद्धा देण्यास तयार आहोत."

त्यांनी उपदेश केला, तसंच स्वतःही सहन केलं. सुळावर लटकलेल्या

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

अवस्थेत तो ईश्वराचा प्रियपुत्र म्हणाला, "आम्ही हे कष्ट स्वेच्छेने भोगत आहोत. तुम्ही सर्वांनी सुखाने जगावं म्हणून! आमच्या जीवनाच्या आहुतीची सार्थकता तेव्हाच होईल जेव्हा निष्ठुरता तुम्ही सर्व आपल्या अंतःकरणातून काढून टाकाल." येशू पुढे म्हणाले, "जो जीवनभर स्वार्थासाठी खपत राहील तो घालवून बसेल, जो माझ्यासाठी आपले जीवन आपलं जीवन खपविल, तो परमेश्वरास प्राप्त करून घेईल." मानवतेसाठी आपल्या हृदयात वेदना वागवणारे येशू ख्रिस्त मेलेले नाहीत. सूक्ष्मात विराट बनले आहेत. जगातील दोन तृतीयांश मानवांच्या हृदयाचे अनभिषिक्त सम्राट बनून विराजमान आहेत." आमच्या स्वतःच्या सखोल अंतःकरणातही ते लपले आहेत. बाहेर प्रकट होण्यासाठी त्यांची एकच अट आहे- शेजाऱ्याचं दुःख आम्हाला आमचीच पीडा वाटावी. समोरच्याचं दुःख आमच्या मनाची घुसळण करील, तर समजावे की ईश्वराशी एकात्मता होणार आहे. भगवान जेव्हा केव्हा आमच्याकडे येतो तेव्हा तो बेचैनीच्या रूपात येतो. तो तर आमच्या आत-बाहेर एक होण्यासाठी उत्सुक आहे, आतुर आहे. पण प्रवेश तरी कसा करावा त्याने! "प्रवेश निषिद्ध" अशी पाटी आम्हीच लावली आहे. निष्ठुरता रूपी पाटी! ती निष्ठुरता, निर्दयता दूर होताच सारे जीवन स्वर्गीय आनंदाने आणि प्रकाशाने भरून जात असतं.

◆◆◆

## ७. अंतःकरणात ज्योत पेटते तेव्हा-

वर्षानुवर्षांचा काळाकुट्ट अंधार संपायला एक क्षण पुरेसा होत असतो. पण केव्हा? आगकाडी पेटते तेव्हा. जीवनातला अंधार सुद्धा त्याच क्षणी विरू लागतो ज्या क्षणी भावसंवेदनांची ज्वाला पेटून उठते. शरीराची नि मनाची सारी शक्ती ती पुष्ट करण्यासाठी संचित होते. मग कोणतेही संकट वा अवरोध त्यास विझवू शकत नाही. उत्तरोत्तर ती वाढतच जाते. कविसम्राट रवींद्रनाथ टागोर एका गीतात म्हणतात-

"यदि झड बादले, आंधार राते दुआर देवघरे।
तबे वज्रानले.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

आपण बुकेन पांजर ज्वालिए निए एकाला चलो रे।।''

अर्थ- जर प्रकाश नसेल, झंझावात नि मुसळधार पाऊस पडत असेल, काळ्या कुट्ट अंधाऱ्या रात्री जेव्हा आपल्याच घरचा दरवाजा सुद्धा तुझ्या लोकांनी तुझ्यासाठी बंद केला असेल, तर त्यां वज्रनलात चक्रीवादळात आपल्या हृदयाच्या पिंजऱ्यास जाळून त्या प्रकाशात तू एकटाच वाटचाल करीत रहा.

कर्मवीर गांधीजींच्या जीवनात अशीच ज्वाला पेटून उठली. तिच्या आगीत जळून गेले सारे मान-सन्मान, आशा-आकांक्षा, पद-प्रतिष्ठेची, इच्छा सारे काही जळून खाक झाले. त्यावेळी ते दक्षिण भारताचा दौरा करीत होते. अफ्रिकेहून परत आल्यावर कर्मवीर या रूपात प्रसिद्ध झाले होते. पण अद्याप त्यांना महात्मा ही पदवी लाभली नव्हती. रस्त्यात त्यांनी एक तरुण मुलगी कशी बशी फाटक्या पातळाने लज्जा झाकत असलेली पाहिली. पातळ काय म्हणायचे, एक मळकट चिथडे म्हटलेलेच शोभेल. डोक्यावर टोपली घेऊन ती जात होती. अवती भवती अनेक तिला पहात होते. उपेक्षा, उदासीनता, विरक्तिपूर्ण नजरेने पाहात होते; पण नव्हती फक्त सहानुभवाची संवेदना. गांधीजींची दृष्टीही तिच्याकडे गेली. त्यांच्या दृष्टीत फक्त सहसंवेदना आत्मीयता होती, दुसरे काही नव्हते.

त्यांनी तिला प्रेमाने जवळ बोलविले, विचारले, मुली तू हे पातळ धूत का नाहीस? फाटलेला भाग शिवून का नाही घेत? या प्रश्नांनी तिचा सारा भूतकाळ अन वर्तमानकाळ, सारे अभाव-दारिद्र्य तिच्या मनास जागृत केले. गंभीर जखमांनी धक्का लावल्यावर जसा प्राण व्याकुळ व्हावा तसं तिचं झालं. तिचं उत्तर होतं- ''दूसरं एखाद पातळ असेल तर धुता येईल ना? शिवण्याच्या लायक असेल तरच शिवावं ना?''

उत्तर ऐकून गांधीजीचा चेहरा लाजेने गोरा-मोरा झाला. जनतेची ही अवस्था! आणि जनतेचा सेवक म्हणवणारा मी मात्र धोतर, सदरा, फेटा या सर्व परिपूर्ण पोषाखात!! इकतंच नाही. एक जोडी पिशवीत सुद्धा आहे. यापेक्षा शरमेची गोष्ट दुसरी कोणती असेल? त्यांनी आणखी काही न बोलता हळूच पिशवीतून एक वस्त्र काढून तिच्यापुढे ठेवले म्हणाले, ''भावाकडून ही

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

भेट बहिणीने घ्यावी." त्या युवतीने हात पसरून ते वस्त्र घेतले. तिच्या मुखावर अतिशय आनंद ओसंडत होता.

युवती निघून गेली. तेथेच गांधीजींनी आपले एक धोतर फाडून त्याचे दोन तुकडे केले. अर्धे नेसायचे आणि अर्धे पांघरायचे हाच त्यांचा कायमचा पोषाख बनला आणि क्षणार्धात कर्मवीर गांधींचे महात्मा गांधी बनले. केवळ पोषाख बदलून का? नाही, अंतःकरणाची धारणाच बदलून गेल्याने ते महात्मा ठरले.

जवळच उभे असणारे साथीदार सहकारी लोक हे अद्भूत परिवर्तन पाहात होते. त्यावर काही म्हणाले, "अरे हे काय केले? तुम्हाला तर थोरा-मोठ्या लोकांना भेटण्याचे प्रसंग येत असतात. अशा विचित्र पोषाखात कसे भेटणार तुम्ही त्यांना?"

"स्वतः सुटा-बुटात राहणारे, कुत्र्यांना मोटारीतून मिरवणारे आणि नोकरांवर रागाने रुबाब करणारे लोक हे मोठे मानता काय? तुमच्या बुद्धीची कीव कराविशी वाटते मला." गांधीजींच्या आवाजात रोष प्रकट होत होता, "हे तुम्ही बोलत नसून तुमच्यातली हीनता बोलत आहे. गौरवाचा अभाव बोलते आहे. ते थोर व मोठे नव्हते. थोर ते असतात ज्यांचं मन प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नित्य नवीन प्रभावी उपायांचा शोध घेत राहते. ज्यांचं शरीर 'अहर्निशं सेवामहे' चे व्रत घेत असते. खोटा मोठेपणा आणि खरी महानता यापैकी एकाचीच निवड करता येते. दोघे एकत्र नांदू शकत नाहीत. महानतेच्या प्राप्तीचा एकच उपाय आहे. सामान्य जनाचं दुःख, दारिद्र्य समजून घेणं आणि काहीही सबब पुढे न करता, त्याच्या निवारणात गढून जाणे." साथीदारांच्या डोक्यात मोठेपणा आणि महानता यातील फरकावर प्रकाश पडला होता. गांधीजी त्याक्षणी पुन्हा म्हणाले, "तुम्ही सामान्य इंग्रज अधिकाऱ्यांची गोष्ट करता, मला इंग्लंडच्या सम्राटालाही भेटावे लागले तरी याच पोषाखात भेटेन."

प्रसंग इथेच संपला. काही वर्षे लोटल्यावर खरोखरच सम्राटाकडून त्यांना बोलवणं आलं. आमंत्रणाबरोबरच निर्देशही होती की त्यांनी इंग्रजी वेषभूषेतच यावे. विरोधक मनात म्हणू लागले आता दिसेल ते कपडे कसे वापरत नाहीत. सर्व महात्मेपण ठिकाणावर राहील.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

पण गांधीजींचा निश्चय अटळ व दृढच राहिला. त्यांनी स्पष्ट कळवलं की सम्राटांना भेटायचं आहे, मला नव्हे. त्यांना हवी असेल माझी भेट तर मी याच पोषाखात येईन. नाहीतर नाही. "गांधीजींच्या आदर्शापुढे सम्राटाला नमावे लागले. इंग्लंडला गेले. सम्राट पंचम जॉर्जने त्यांचा हा विचित्र वेष पाहून विचारले, "असं काय घडलं की आपण हा वेश धारण केलाय?"

"एखाद्या वज्रकठोर माणूसच वैभव विलसाचा साठा करू शकतो. एखाद्या भावनाशील माणसाला ते शक्य नाही."बादशहा पंचम जॉर्ज- जवळ याचं उत्तर नव्हतं.

भावनांच्या संवेदनेनंतरचा टप्पा म्हणजे क्रियाशीलता. बेचैन तर रोगी सुद्धा होत असतो पण तो खाटेवर पडल्या पडल्या हात पाय पटकत राहतो. कण्हत असतो. त्याच्याकडून दुसरं काही होत नसतं. उलट इतरांना त्याची सेवा-शुश्रूषा करावी लागते. उदात्त व उत्कट भावना उचंबळून येतात तेव्हा येणारी तळमळ व बेचैनी यापेक्षा वेगळी असते. ती माणसाला कृतिशील बनण्यास भाग पाडते.

महात्मा गांधींच्या जीवनात हीच कृतिशीलता वाढत गेली. त्यांनी आपलं जीवनचक्र इतक्या वेगाने घुमवलं की एकाच वेळी अनेक कामे करून ठेवली. स्वराज्य, स्वावलंबन, ग्रामसुधारणा या सोबतच आणखी त्यांनी एक इतके थोर कार्य केले आहे की इतिहास ते कधीच विसरणार नाही. ते म्हणजे समाजाला लोकसेवक अर्पण करणे, विनोबा, नेहरू, पटेल, कृपलानी अशी शेकडो थोर माणसं त्यांनी घडवली. त्यांचं एकच स्वप्न होतं - रामराज्य आणणं. ते अजूनही पूर्ण झालेलं नाही. रामराज्य म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून अशा एका समाजाची जडण-घडण की जिथं माणसांची पारख त्यांच्या भावचेतनेच्या आधारे होते. आगामी काळात हेच घडणार आहे. समाजाची आचजी स्थिती आणि भविष्यातली स्थिती यात हाच फरक होणार आहे. तेव्हा प्रत्येकात उदारपणा, आपलेपणा, सहानुभूती या गोष्टी उत्कटपणे आढळतील. अशा स्थितीत परमार्थातच स्वार्थ दिसू लागतो. परिवर्तनाच्या या महान पर्वात आम्ही स्वतः सुद्धा बदलले पाहिजे. निष्ठुरतेचा खोटा बुरखा उतरून फेकावा.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

समरसता, सहानुभूती, सह-अनुकंपा या सरस भावना उत्कट बनल्या की दृष्टिपथात येईल. स्वर्गीय राज्य. तो काळ आता फार दूर राहिलेला नाही.

◆◆◆

## ८. संवेदनेची दिव्य दृष्टी

पृथ्वीचे स्वर्गीकरण हा महाकालाचा निर्धार आहे. तो अचल व अटल आहे. जे होणार आहे, ते होईलच. या काळात आमचे एकमेव कर्तव्य आहे. स्वतःच्या दिव्य भाव-भावनांचे जागरण घडविणे. याच एका मार्गाने आपण भावी परिस्थितीत राहण्यास सुपात्र ठरू. कृती तशीच व्हावी, जशी ठक्कर बाप्पांची होती.

त्या काळात ते बडवाणमध्ये मुख्य इंजिनीयर होते. त्यांची राहणी सुद्धा उच्च शिक्षणास अनुरूप होती. एके दिवशी त्यांच्या घरी संडास साफ करणारा हरिजन आला होता. त्याचा कृश देह, रडका चेहरा, फाटके कपडे त्याच्या दैन्याची कथा करुणाजनकपणे सांगत होते. इंजिनीयर अमृतलाल ठक्कर यांनी त्यास सहज स्वाभाविकपणे सल्ला दिला, "बाबारे! साफसफाईपूर्वक रहात चल. कपडे स्वच्छ ठेवत जा."

"बाबू, मी इंजिनीयर नाही, की कोट-पाटलून नेसावी." हरिजन.

"काय अडचण आहे?"

"वैभवाच्या, श्रीमंतीच्या भिंतीतून व थाटामाटाच्या पहाऱ्यातून गरीबांची करुण हाक नि आक्रोश प्रवेश करू शकणार नाहीत. कदाचित तुम्ही आमच्या स्थितीत राहिले असते तर समजू शकले असते..." त्या हरिजन वृद्धाची वाक्ये बाणाप्रमाणे ठक्करांच्या हृदयाला भिडली व त्यांनी मर्मभेद केला. ते शब्द त्यांना खूपच झोंबले. पण तो ठीकच म्हणत होता. पोकळ शब्दांनी कधी कुणाचं कल्याण केलं आहे? संवेदनशीलांचं एकच लक्षण असतं- तो जे काही बोलतो ते आचरणाच्या द्वारेच. तसे नसले तर समजावे की बुद्धीने फुलवलेली वाणी नवीन रूपात प्रकट होत आहे, इतकंच! ती वाणी नेहमीच अप्रमाणिक असते. कारण ती ओठांपुरती व लापणिक असते. उपदेशकाने श्रोत्यांशी आपली अनुभूती एक करावयाची असते. आत्मीयता, प्रेमाचा ओलावा, जिव्हाळा

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

यांच्या अनुपानाशिवाय खरोखर जीवनविद्या कधी कुणाच्या गळी उतरली आहे काय?

बस्स! मग काय झाले? परिवर्तनाची वेळ येऊन थडकली. नोकरी सोडली. कोट-पँटला सोडचिट्ठी मिळाली. आलिशान बंगल्यास लाथ मारली. सचेतन संवेदनांनी पुष्ट प्राणबळ घेऊन पोहचले हरिजनवाड्यात. एका मोडक्या झोपडीत राहू लागले. सर्वांच्या घरी सफाई करणाऱ्या हरिजनांच्या वाड्यात ते स्वतः सफाई करू लागले. आता ते हरिजनांचेही हरिजन बनले. त्यांना शिकवित म्हणत- "पहा, या स्थितीतही स्वच्छ कसं राहता येते, सुसंस्कृत होता येतं."

फावल्या वेळेत त्यांच्या मुलांना शिकवायचे, प्रौढांना पुस्तकांतून वाचून जीवनोपयोगी व्यावहारिक गोष्टी सांगायचे. चांगले कसे राहायचे ते शिकवित. सुरुवातीस काही वेळ देणारे पुढे पूर्ण वेळ सेवेत समर्पित झाले व सर्वांचे ते ठक्कर बाप्पा बनले होते. दुःखी व कष्टी जनांचं दुःख पिऊन नीलकंठ बनलेल्या बाप्पांचं हे अद्भूत रूप पाहून म. गांधी त्यांच्या विषयी गौरवाने म्हणाले, "अहाहा! मला सुद्धा बाप्पांसारखी संवेदनांची श्रीमंती मिळाली असती, तर स्वतःला धन्य मानले असते.

देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातून पीडित मानवतेची हाक ऐकू येताच बाप्पांच्या मनात ठाण मांडू बसलेल्या भगवान विष्णूस ती गजेंद्राच्या हाकेसारखी वाटायची व ते गरूड वाहनाची पर्वा न करता धावून यायचे. त्यांच्या मागोमाग लोककरुणेची सरिता वाहायची.

संवेदनशील माणसालाच योग्य दृष्टी लाभते. इतरेजन तर डोळे असून आंधळे बनतात. त्यांना मानवतेची तगमग नि चडफड जाणवतच नाही. बाप्पांजवळ हीच दिव्यदृष्टी होती. एकदा ते जयपूरला होते. भारताच्या पॅरिसमध्ये, लोक जयपूरची खूप स्तुती करायचे. बाप्पांना जयपूरचे भव्य महाल आवडले नाहीत. वैभव रुचले नाही. त्यांना तीव्रपणे जाणवली तिथल्या भंग्यांची नारकीय दशा. तिच्याकडे कुणाचंच लक्ष वेधलं नव्हतं. त्यांच्या रोमरोमास तिथलं दैन्य-दारिद्र्य झोंबलं. ते त्यांच्या सेवेत रमले. जनतेचे सहकार्यही खूप मिळालं. जयपूरच्या हरिजनांची स्थिती सुधारली.

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

किशोलाल मश्रुवाला यांच्या शब्दात- "बाप्पांच्या भावसंवेदनांच्या आकर्षणांच्या बंधनात हरि बांधला गेला होता. तो त्यांच्या भोवतीच राहायचा व लोळायचा." बाप्पा म्हणायचे, "माझा हरी दीन-दलितांच्या झोपडीत राहतो. त्याच्याशी मी समरस झालो आहे." एक दिवस बाप्पा दिल्लीत हरिजन निवासात बसून गुजरातीतलं भजन गात होते.

हरिना जन तो मुक्ती न माँगे। माँगे जनभोजनं अवतार रे।
नित सेवा नित कीर्तन ओच्छव। निरख नंदकुमार रे।।

तिथे उपस्थित असलेल्या वियोगी हरींनी विचारलं, "तुम्ही पाहिलं आहे का नंदकुमारला?"

भाव विव्हल होऊन बाप्पांच्या मुखातून शब्द बाहेर पडले, "का नाही? नंदकुमाराचं दर्शन तर मी किती तरी रुपांतून घेतलं आहे. आदिवासींच्या नि हरिजनांच्या गोकुळधामात!"

नंदकुमाराचं दिव्यधाम पुन्हा या पृथ्वीवर लवकरच अवतरणार आहे. आम्ही सुद्धा याच त्वेरेने संवेदनांना जागृत करून दिव्य दृष्टियुक्त व्हावे. असे न घडले तर कदाचित आम्हाला अंधकारात चाचपडत रहावे लागेल. या भटकंतीतून वाचण्यासाठी आम्ही स्वतःला भावसंवेदनांच्या दिव्यराज्याचे अधिकारी बनविले पाहिजे. हाच क्षण आमच्या आत्मजागृतीचा क्षण सिद्ध व्हावा.

◆◆◆

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org